**प्रेस नोट**

**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**दि.१३.१०.२०२१**

**आलोसे मिलींद सांडु केदार, वय ५४ सहा.पोलीस उप निरीक्षक, नेमणुक– स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव (महिला सहाय्य कक्ष,पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव) ता.जि.जळगांव, यांना २०,०००/–रु.लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव यांची कारवाई**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | जिल्हापेठ पो.स्टे. गु.र.नं.४४६/२०२१ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | मिलींद सांडु केदार, वय–५४, सहा.पोलीस उप निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव (महिला सहाय्य कक्ष,पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव), रा.कृषी कॉलनी, नवसाचा गणपती मंदिराजवळ,जळगांव,ता.जि.जळगांव. **(पोलीस विभाग–वर्ग ३)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१३/१०/२०२१<br>२५,०००/–रु. व तडजोडीअंती २०,०००/–रु.लाचेची मागणी |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | २०,०००/–रु. (त्यात ५००/– रू.दराच्या ४० नोटा अ.पा.लावलेल्या) |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१३/१०/२०२१ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी यांचे सन–२०१६ साली काजल भरत परदेशी हिच्याशी विवाह झालेला असुन त्यांना ०३ वर्षाची मुलगी आहे. मागील चार वर्षापासुन फिर्यादी व त्यांची पत्नी यांच्यात भांडणतंटा होत असल्याने सुमारे मागील चार वर्षापासुन फिर्यादीची पत्नी तिच्या मुलीसह माहेरी राहावयास आहे. त्याबाबतचे चौकशी प्रकरण व न्यायालयीन प्रकरण चालु आहे. फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादी व त्यांचे कुटूंबियांविरुद्ध महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव येथे तक्रारी अर्ज दिलेला होता. सदर अर्ज महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव येथील सफौ/मिलींद केदार यांचेकडे चौकशीकामी होता. त्यामुळे फिर्यादी हे सदर चौकशी कामी दि.१२/१०/२०२१ रोजी महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव येथे हजर राहीले असता, सफौ/मिलींद केदार यांनी फिर्यादी यांना सांगितले की, तुझे पत्नीने तक्रार अर्जामध्ये तु दुसरे लग्न करणार आहे असे नमुद केले आहे. तु तुझ्या पत्नीस चार लाख रुपये दिले असा घटस्फोट करारनामा केलेला असुन तो खोटा व बनावट आहे असे तुझ्या पत्नीने मला सांगितले. सदर प्रकरणात तुझ्यावर व तुझ्या कुटूंबीयांवर कलम ४९८ प्रमाणे गुन्हा दाखल होणार आहे असे सांगितले आहे. परंतु तु जर मला २५,०००/–रु.आणुन दिले, तर तु दुसरे लग्न करणार आहे, तो मुद्दा मी अहवालात नमुद करणार नाही. तसेच, तु तुझ्या पत्नीस चार लाख रुपये रोख दिले असा जो करारनामा केला आहे तो मी अहवाला सोबत पाठवुन देईल त्यामुळे तुझ्यावर होणाऱ्या केसमध्ये त्याचा तुला फायदा होईल. तसेच,मी तुझा अहवाल एमआयडीसी पोलीस स्टेशनला पाठवत नाही. तो पर्यत तुझ्यावर कलम ४९८ चा गुन्हा दाखल होणार नाही असे सांगुन आरोपी लोकसेवक यांनी २५,०००/–रुपये द्यावे लागतील. तेव्हा फिर्यादी यांनी त्यांना सांगितले आता माझ्याजवळ पैसे नाहीत मी तुम्हाला उद्या दि. १३/१०/२०२१ रोजी भेटण्यास येतो असे सांगितले. तेव्हा आरोपी लोकसेवक हे माझ्याकडे वरील नमुद मुद्यांवरील अहवालात मदत व एमआयडीसी पोलीस स्टेशनला न पाठविण्याच्या मोबदल्यात २५,०००/–रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.१३.१०.२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने दि.१३.१०.२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे मिलींद केदार यांनी वरील मुद्यांवर अनुकूल अहवाल तयार करुन सदर अहवाल एमआयडीसी पो.स्टे.ला न पाठविण्याच्या मोबदल्यात २५,०००/–रुपये व तडजोडीअंती २०,०००/–रु.लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारासमक्ष फिर्यादी यांचेकडुन स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.**

**संपर्क पत्ता:– लाप्रवि.जळगांव कार्यालय**

**ईमेल आयडी:– dyspacbjalgaon@gmail.com**

**संकेतस्थळ:– acbmaharastra.nct**

**टोल फ्री क्रमांक:– १०६४**

**दुरध्वनी क्रमांक:– ०२५७–२२३५४७७**

**व्हॉट्सअॅप क्रमांक:– ८७६६४१२५२९**

13.10.2021

**शशिकांत श्रीराम पाटील**

**पोलीस उप अधिक्षक**

**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**